# प्रेसनोट

दि -१२/१२/२०१८

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाने पोलीस अधीक्षकं श्री दिक्षीतकुमार गेडाम तसेच श्री.निमित गोयल, अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्या सुचनेनुसार व सहा. पोलीस निरीक्षक श्री. जे.एस.कळेकर सोबत सपोफौ/८२ मिशाळ,पोकॉ/१२७१ पाटील, व पोकॉ/१२८३ जाधव, सर्व नेमणुक बांदा पोलीस ठाणे नेमणुकी यांचे पथकाने बांदा कटटा याठीकाणी अवैधरित्या बिगरपरवाना दारु कार मधून वाहतूक करीत असल्याबाबत गोपनीय माहिती प्राप्त होताच सदर ठिकाणी छापा टाकला असता सदर छाप्यात सुमारे १,१०,०००/- रुपये किमतीची काळया पांढ-या रंगाची कार तसेच ८८,०००/- रुपये किमतीची गोवा बनावटीची दारु असा एकूण १,९८,०००/- रुपये किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आलेली आहे. नमुद कारवाईत २ इसमास ताब्यात घेवून त्यांचेविरुध्द महा.प्रोव्ही. अधिनियम कायदा कलम अंतर्गत बांदा पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच यापुढे सर्व प्रकारच्या अवैध धंदयाचे उच्याटन करण्यासाठी अशीच धडक कारवाई सुरु राहणार आहे.

(दिक्षीतकुमार गेडाम)
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग